CR2006022413

18

(८) क्रमांक-सिटीएस/सीआर ७०९१/ना.भू-१/०६
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.रा) पुणे यांचे कार्यालय
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
विधान भवनसमोर, पुणे ४११ ००१
दिनांक-२४/२/२००६

27 FEB 2006

**परिपत्रक**

**विषय:- नगर भूमापन आलेखाच्या नकला देतांना करावयाची कार्यवाही**

राज्यातील नगर भूमापन अधिकारी तसेच तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयातून मूळ नगर भूमापन आलेख, छापील आलेख, पुनर्विलोकन आलेख यांच्या नकला जनतेस देणेत येतात. या नकला जागेची मूळ नगर भूमापनाचे वेळीची स्थिती अथवा त्यानंतर झालेला बदल या बाबी दर्शवितात. त्यामुळे एकाच जागेच्या मूळ आलेख, छापील आलेख, पुनर्विलोकन आलेखाच्या नकला घेतल्यास त्यामध्ये दर्शविलेल्या बांधकामात बदल दिसतो. परंतु नक्कल जागेची कोणत्या कालावधीची स्थिती दर्शविते याचा उल्लेख नकलेवर नसतो.

हया नकला विविध कामासाठी महानगरपालिका, नगरपालिका, सरकारी कार्यालये, न्यायालये यांचेकडे सादर करणेत येतात. या नकलेच्या आधारे निर्णय घेणा-या अधिका-यांना, नक्कल जागेची कोणत्या कालावधीची स्थिती दर्शविते याची कल्पना असणे आवश्यक आहे. जेणे करून आवश्यकता भासलेस या अधिका-याकडून जागेची आद्यावत स्थिती दर्शविणारा नकाशाची मागणी करणेत येईल.

याबाबत उपाय योजना करणे आवश्यक आहे. यापुढे जनतेस नकला देताना, नकलेवर पुढीलप्रमाणे शेरा नमूद करावा.

**१) सदरची नकल मूळ नगर भूमापन आलेख /छापील आलेख/ पुनर्विलोकन आलेखा वरून देणेत आली आहे.**

**२) सदरची नक्कल मूळ नगर भूमापनाचे वेळेची जागेची परिस्थिती दर्शविते/ पुनर्विलोकनाचे वेळी जागेवर आढळून आलेली स्थिती दर्शविते. (जेथे शक्य आहे त्या ठिकाणी मूळ नगर भूमापनाचे वर्ष अथवा पुनर्विलोकन कोणत्या कालावधीत करणेत आले याबाबत तपशिल नमूद करावा.)**

**३) सदरची नक्कल जागेवरील आद्यावत स्थिती दर्शवित नाही. जागेची आद्यावत स्थिती दर्शविणा-या नकाशासाठी मोजणी करून घेणे आवश्यक आहे.**

वरीलप्रमाणे शेरे नमूद केलेस नकलेबाबत कोणताही संभ्रम राहणार नाही. यापुढे नगर भूमापन आलेखाच्या नकला उपरोक्त नमूद शेरा ठेऊनच जनतेस पुरवाव्यात. यासाठी वरील शे-याचा

9869 962
न.भू२
28 FEB 2006

४. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील कलम १०६ व कलम १३५ अन्वये वापरावयाचे वरील अधिकार हे जिल्हाधिकारी यांना असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशाविरुध्द अपर आयुक्त यांचेकडे अपील करावे असे याच संहितेच्या परिशिष्ठ 'ई' मध्ये नमुद करण्यात आले आहे.

५. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील परिशिष्ठ 'ई ' मधील स्पष्टीकरण विचारात घेता खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

(अ ) शासन पत्र क्रमांक डीओपी १०९५/प्र.क्र.२७०/ल-१,दि.३.६.१९९७ मधील सूचना रद्द करण्यात येत आहेत.

(ब) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १०६ व कलम १३५ मधील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी यांनी पारित केलेल्या ~~दिलेल्या~~ आदेशाविरुध्दच्या प्रकरणात अपर आयुक्त हे अपिलीय प्राधिकारी असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

०७/१०/२००५

( रा. शं. नागरे )
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

प्रत : जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख,महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय आयुक्त
सर्व उप संचालक, भूमि अभिलेख
सर्व जिल्हाधिकारी
सर्व अधिक्षक भूमि अभिलेख.
ल-१ कार्यासन निवडनस्ती.